महाराष्ट्र शासन
वन विभाग

# वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय

(नवीन प्रशासकिय इमारत, वन भवन, भवन्स स्कूल समोर, नागपूर 440 001 )
(Land Line No - 0712-2564569, Email id - ccfnagpur@mahaforest.gov.in)

क्र.कक्ष-10/जमीन/प्र.क्र.1033 /2024-25/ 282 दिनांक : 29 एप्रिल 2024

विषय :- Diversion of 3.064 ha. forest land for construction of 220KV D/C Transmission Line from Umred to Nagbhid under Forest Conservation Act, 1980. (Bramhapuri-2.998 ha. & Nagpur-0.066 ha.)
(FP/MH/TRANS/44469/2020)

संदर्भ :- 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपुर यांचेकडील प.क्र.कक्ष-17/2/ नोडल / PID / 44469/3173 दि.14/02/2024.
2) आपले कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-11/वनसंवर्धन/15, दिनांक 03/04/2024.
3) या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-10/जमीन/प्र.क्र.1033/7, दिनांक 18/04/2024.
4) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपुर यांचेकडील प.क्र.कक्ष-17/2/नोडल/ID-461063 /183 दि.26/04/2024.
5) दिनांक 22/02/2024 रोजी संपन्न झालेल्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या 78 व्या बैटकीत मंडळाने दिलेल्या निदेशानुसार समिती गठन करणेबाबत.
6) केंद्र शासन, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.WL-6/31/2024-WL, दि.22/04/024.
7) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर यांचे कडील पत्र क्र कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.14/229, दिनांक 25/04/2024.

विषयांकित प्रकरणी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे कडील संदर्भिय पत्र क्र 1 अन्वये उपस्थित केलेल्या 1 ते 4 मुद्यांची त्रृटी पुर्तता अहवाल आपले कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.2 अन्वये, प्राप्त झालेला असुन या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र 3 अन्वये 1 ते 4 मुद्यांचा त्रुटी पुर्तता अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडे सादर करण्यात आलेला होता.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील संदर्भिय पत्र क्र 4 अन्वये सादर केलेल्या अहवालात नकाशे हे परिपुर्ण नसल्याचे नमुद केलेले असुन केंद्र शासनाचे पत्र क्रमांक FC-1/MH-335/2023, दिनांक 27/07/2023 अन्वये उपस्थित केलेल्या 1 ते 12 मुद्यांची माहिती एकत्रित करून मुद्देनिहाय व त्यांचे सहपत्रासह, नकाशेसहित सादर करणेबाबत कळविलेले आहे. तरी सदरचा अहवाल आंग्ल भाषेत (इंग्रजीमध्ये) तात्काळ या कार्यालयास सादर करावा. जेणेकरून अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.

तसेच राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने दिनांक 22/02/2024 रोजी संपन्न झालेल्या 78 व्या बैठकीमध्ये चर्चा करून मंडळाने तत्वत: मान्यता देण्याचा निर्णय घेतला आणि स्थळ पाहणी संस्था, महाराष्ट्र वन विभाग आणि प्रकल्प यंत्रणेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली एक समिती गठीत करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने प्रस्तावित ट्रान्समिशन लाईनच्या खाली असलेल्या क्षेत्राचे स्थळ निरिक्षण व उपशमन-उपाययोजना सुचवने करिता दिनांक 01/05/2024 ते 03/05/2024 पर्यंत सदर समितीची भेट होणार असल्याचे केंद्र शासनाचे संदर्भ पत्र क्र 6 अन्वये कळविलेले असुन सदर पत्राची छायांकित प्रत सहपत्रित करण्यात येत आहे, तरी त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही योजावी, तसेच सदर स्थळ निरिक्षणाच्या वेळेस संबंधित कार्यकारी यंत्रणा उपस्थित राहतील याबाबत आपल्या स्तरावरून वेगळ्याने सुचना संबंधित यंत्रणेस देण्यात याव्या.



Scanned with OKEN Scanner

प्रस्तुत प्रकल्पाचे स्थळ निरीक्षण करून आवश्यक असलेल्या उपशमन-उपाययोजनांबाबत अहवाल आणि उपशमन-उपाययोजनां प्रकल्प यंत्रणा त्यांचे खर्चाने कार्यान्वीत करेल असे हमीपत्र सादर करणेबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र 7 अन्वये कळविलेले आहे. तरी सदरचे हमीपत्र या कार्यालयास सादर करावे, जेणेकरून अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.

सहपत्र:- वरिलप्रमाणे

(पी.जी.कोडापे)
विभागिय वन अधिकारी (दक्षता),
वनसंरक्षक (प्रा) नागपूर,
यांचे कार्यालय

प्रति,
उपवनसंरक्षक,
नागपूर वनविभाग, नागपूर.

प्रतिलीपी:- कार्यकारी अभियंता, एचव्ही प्रोजेक्ट डिव्हीजन-१, २ रा माळा, विघृत भवन, काटोल रोड, नागपूर ४४००१३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रषित.

Scanned with OKEN Scanner